**<u>पुढील उलटपास प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी. एन. प्रभु यांचे मार्फत</u>**

०९. माझे म्हणण्याप्रमाणे दावा जमिनीमधील उत्पन्न म्हणजे काजूची, कोकमची, सुरंगीची झाडे, चार माड आणि इतर झाड–झाडोरा आहे.

प्रश्न– सदर उत्पनाच्या झाडाची म्हणजे काजू सुरंगी व कोकम यांची नोंद पिकपहाणी सदरी करुन घेण्यास तुम्हाला काही अडचण होती का?

उत्तर– काजूची नोंद पिकपहाणी सदरी केलेली आहे.

१९८७–१९८८ साली पिकपहाणी सदरात मी काजुची नोंद झालेली पाहिली.

प्रश्न– १९८७–८८ साली तुम्हाला समज आल्यापासून तुम्ही ज्या जमिनीच्या सातबाराला पिकपहाणी सदरी काजुची नोंद झालेली पाहिलेली आहे, त्या जमिनीबाबत तुम्हाला कुळहक्क उभा करायचा आहे असे तुमचे म्हणणे आहे?

उत्तर– आम्ही सदर मिळकतीला पहिल्यापासून कुळ आहोत आणि जमिन वेतोबा देवस्थानच्या नावे आहे.

दावा मिळकतीला काजु बागयतीची नोंद असणारा सातबारा मी या दाव्याचे कामी हजर केला आहे. मी दाव्यासोबत सादर केलेल्या सातबारावर, जो निशाण ७ वर आहे त्याच्यामध्ये काजुबागायत बाबत नोंद नाही. त्यामध्ये माड बागायत अशी नोंद आहे.

प्रश्न–ज्याअर्थी सातबारावरती काजु बागायत, कोकम, सुरंगी यांच्याबाबत नोंद नाही त्याअर्थी तुम्हाला तशी नोंद करुन घेण्यास काही अडचण होती का?

उत्तर– काजुबागायतीची नोंद साताबरावरती आहे. इतर झाड–झाडोरा देखील आहे परंतु त्याची नोंद करण्याचा प्रश्न आला नाही.

दावा दाखल झाल्यानंतर दावा मिळकतीसंदर्भात पिकपहाणी संदर्भात काही बदल झालेला नाही. दावा मिळकतीवरती काजुबागायत असल्याबाबत दर्शविणारा सातबारा उतारा आजपावेतो दाव्यामध्ये हजर केलेला नाही. काजुबागायत नोंद असणारा दावा मिळकती संदर्भातील सातबारा माझेकडे आहे. सदर सातबाराची आवश्यकता असल्यास मी हजर करु शकतो. माझेकडे असणारा सदर सातबारा निशाण ७ कडील सातबारा नंतरच्या कालावधीतला आहे.

१०. दावा दाखल केल्यानंतर दावा मिळकतीच्या पिकपहाणी सदरामध्ये बदल करावा अशा आशयाचा अर्ज मी तलाठी यांचेकडे दिलेला नाही. दावा दाखल झालेनंतर दावा

जमिनीची तलाठी सजा आरवली यांनी पिकपहाणी केलेली नाही. दावा दाखल झालेनंतर अन्य कोणत्याही महसुल अधिका—यामार्फत दावा मिळकती संदर्भात पिकपहाणीची पहाणी करण्यात आलेली नाही. माझे म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीत असणा—या काजू, कोकम, सुरंगी, माड या झाडांनी किती क्षेत्र व्यापले आहे हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न— तुम्ही अगर तुमचे पुर्वाधिकारी यांनी दावा जमिनीच्या पिकपहाणी सदरामध्ये जमिन कसणा—याचे नाव या रकान्यामध्ये नाव लावून घेण्याचा प्रयत्न केला होता का?

उत्तर— वडिलांच्या मृत्युनंतर वारसाहक्काने आमची नावे तेथे दाखल झाली आहेत.

तलाठी कार्यालयात मी कधी काम केलेले नाही. मला जमिनीच्या सातबारा बाबत माहिती आहे.

प्रश्न— सातबारावरील कुळाचा रकाना आणि पिकपहाणी याबाबत तुम्हाला माहिती आहे का?

उत्तर— सातबारावरील क्षेत्राचे नाव, क्षेत्र, भोगवटदार सदरात असलेले नाव, इतर अधिकार याबाबत मला माहिती आहे.

प्रश्न— सातबारावरील पिकपहाणी बाबत तुम्हाला माहिती आहे का?

उत्तर— पिकपहाणी बाबत मला तपशिलवार माहिती नाही.

प्रश्न— पिकपहाणी सदरामध्ये तुमचे नाव लागले आहे किंवा कसे हे तुम्हाला माहिती आहे का?

उत्तर— पिकपहाणी सदरामध्ये आमचे नाव आहे की नाही हे मला माहिती नाही.

(साक्षीदाराला निशाण ७ वरील सातबाराचा मागील भाग दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की पिकपहाणीमध्ये जमिन कसणा—या रकान्यामध्ये आमचे नाव नाही.

मला याबाबत कल्पना नाही की माझे पुर्वाधिकारी यांनी पिकपहाणी सदरी आमचे नाव नोंद होण्यासाठी काही प्रयत्न केले होते किंवा कसे.

**प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील प्रभु यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/—

दिनांक :— २९/०८/२०१८.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.